# पर्यावरणीय व मानवी समस्या



: संपादक :
प्रा. डॉ. जयदीप रामकृष्ण सोळुंके

| No | | No |
|---|---|---|
| 12 | प्राणायामांचे शरीर संस्थावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास<br>**- डॉ. भालचंद्र सानप** | 64 |
| 13 | प्लास्टिकचा वापर आणि पर्यावरण प्रदुषण - **प्रा. डॉ. आनंद शिंदे** | 69 |
| 14 | भारतातील बेरोजगारी एक सामाजिक समस्या<br>**- प्रा.डॉ. एस. के. रोड्डे , श्रीकांत सुभाषराव गव्हाणे** | 73 |
| 15 | महाराष्ट्रातील शेतमजुराच्या विविध प्रकारचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**- डॉ. सुनिल जाधव** | 77 |
| 16 | "मानवी हस्तक्षेप आणि पर्यावरण असंतुलन" एक भौगोलिक अभ्यास<br>**- प्रा. डॉ. मिर्झा वाजिद बेग रुस्तुम बेग** | 83 |
| 17 | "स्त्री भ्रूणहत्या" आधुनिक समाजातील एक अमानवी वास्तव<br>**- प्रा.राहूल अरुण सिरसट** | 88 |
| 18 | गुन्हेगारी **- तुषार किशोर कांबळे** | 96 |

17

# "स्त्री भ्रूणहत्या" आधुनिक समाजातील एक अमानवी वास्तव

**प्रा.राहूल अरुण सिरसट**
समाजकार्य विभाग,
क्रांतीसुर्य अण्णासाहेब पाटील समाजकार्य, महाविद्यालय,धाराशिव

**सारांश**

*स्त्रीभ्रूण हत्या ही देशातील एक गंभीर समस्या. ग्रामीण-शहरी, सुशिक्षित- अशिक्षित किंवा उच्च-कनिष्ठ, जात-धर्म, वर्ग यापैकी कशाचेही बंधन नाही. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागातही महिला वरील अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात. ग्रामीण व शहरी महिला अत्याचाराचे स्वरूप जरी वेगळे असले तरी प्रमाण सारखेच आहे. शहरी भागात मुलागा- मुलगी समान हा नारा दिला जात असला तरी प्रत्यक्षात शहरी भागात मोठ्या प्रमाणावर स्त्रीभ्रूणहत्या होतात. निरक्षरापेक्षा साक्षर लोकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आपल्या सोयीनुसार करून घेण्याचे ज्ञान असल्यामुळे स्त्रीभ्रूणहत्या, वेश्या व्यवसायासाठी मुलींचे खरेदी विक्रीचे प्रकार, महिला वरील अत्याचार, फसवणूक या घटना शहरात अधिक दिसून येतात. शासकीय यंत्रणा, राजकारणी, व्यावसायिक, गुंड, गुन्हेगारांचे लागेबांधे असणारे असल्याने या प्रकरणावर नियंत्रण कोणाचे असणार हा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणूनच बऱ्याच अत्याचाराच्या घटनांची नोंद न घेतल्यामुळे अत्याचारित महिलांना न्याय मिळणे दूरच राहते या उलट त्या महिलांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. गुन्हेगार मात्र पुढचे गुन्हे करण्यासाठी मोकाट सुटतो.*

**बीज सज्ञा :** स्त्रीभ्रूणहत्या कारणे, परिणाम व उपाय योजना इ.

**प्रस्तावना :-**

भारतीय संस्कृती जगामध्ये महान व प्राचीन संस्कृती मानली जाते. भारतीय संस्कृती ही पुरातन काळामध्ये एक पुरुष प्रधान संस्कृती मानली जाते. भारतामध्ये महिलांना समाजामध्ये खऱ्या अर्थाने स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. परिणामी स्त्रीभ्रूणहत्या होतात.

"स्त्रीभ्रूणहत्या" म्हणजे केवळ स्त्री आहे म्हणून गर्भ जाणूनबुजून नष्ट करणे. ही कृती सहसा जन्मपूर्व चाचणीद्वारे गर्भातील बाळचे लिंग निश्चित केल्यानंतर केली जाते. काही समुदायांमध्ये, मुलींपेक्षा मुलांना प्राधान्य दिल्याने स्त्रीभ्रूणांचा निवडक गर्भपात होतो. कडक कायदे असूनही, ही प्रथा अनेक प्रदेशांमध्ये सुरू आहे, ज्यामुळे स्त्रीभ्रूणहत्या हा सामाजिक जागरूकता आणि शैक्षणिक चर्चेसाठी एक महत्त्वाचा विषय बनला आहे.

**संवेदना शून्य समाजाचे प्रतिबिंब :**

स्त्रीभ्रूणहत्या मानवी भूगोलाच्या माध्यमातून लिंग गुणोत्तराच्या माध्यमातून पुरुष व महिला यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये तपवत दिसून येते. आज समाजामध्ये खऱ्या अर्थाने मुलगी हे परक्याचं धन आहे या उद्देशाने अनेक मुलीचा जन्म जन्माच्या अगोदर नाष्टा झाला आज समाजामध्ये मुलांकरिता विवाह करिता मुली मिळत नाहीत एक सामाजिक

ा निर्माण होत आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये प्रति 1000 पुरुषामागे 929 इतके लिंग र आहे.

आज समाजामध्ये स्त्री पुरुष समानता याच्या माध्यमातून सामाजिक समतोल हा मानवी जीवनाची साखळी त आहे. आज कित्येक गावांमध्ये अनेक मुलांचे विवाह होत नाहीत कारण त्याला मुख्य घटक हा स्त्री भ्रूणहत्या

भारतामध्ये स्त्रीभ्रूण हत्या हा घटक सामाजिक विषय बनला आहे. याच सामाजिक विषयाच्या माध्यमातून समाजामध्ये काही मुलांचे लग्न होत नाहीत. वंशाला दिवा पाहिजे या माध्यमातून अनेक पालकांनी मुलगी नकोय स्त्रीये भ्रूणहत्या या माध्यमातून मुली नष्ट करण्यात आल्या.

आपल्याला
आजी पाहिजे!
आई पाहिजे !
बहिण पाहिजे!
बायको पाहिजे !
परंतु मुलगी नकोय....?

आज समाजामध्ये स्त्री भ्रूण हत्या या माध्यमातून समाजातील असणारी एक मानवी समाजाची साखळी बिघाड होत आहे. मुलगी हे परक्याचं धन असं म्हटलं जात आणि मुलगा वंशाचा दिवा म्हटला जातो..

:-

स्त्री भ्रूणहत्या या सामाजिक समस्येची तीव्रता कमी करणे.

स्त्रियांना पुरुषाबरोबर समाजात स्थान निर्माण करून देणे.

स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलणे.

सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, व्यावसायिक व कौटुंबिक क्षेत्रात महिलांना संधी उपलब्ध करून देणे.

स्त्री-पुरुष भेद नाहीसा करणे.

**न पद्धती व माहिती स्त्रोत :**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता दुय्यम माहिती स्तोत्राचा व द्वितीयक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादीच्या माध्यमातून माहिती गोळा करून त्याची विश्लेषण करून संशोधन त आले आहे.

**विवेचन :-**

21 शतकामध्ये लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्याच गतीने स्त्रियांचे प्रमाण वाढणे अपेक्षित होते. हिलांची लोकसंख्या वाढलेली दिसून येत नाही. याउलट त्यात घट झालेली आहे. 0 ते 6 वर्ष वयोगटातील संख्या घटताना दिसून येते. त्याची कारणे स्त्रीभ्रूणहत्येचे वाढलेले प्रमाण ही आहे. देशातील विकसित घटक ा विचार केल्यास स्त्रियांचे प्रमाण खूपच कमी असल्याचे दिसून येते. दर 1000 मुलांमागे केरळमध्ये 1084, नाडू 995, पश्चिम बंगाल 950, मध्य प्रदेश 931, महाराष्ट्रात 929, राजस्थान 928, गुजरात 919, 918, उत्तर प्रदेश 912, दिल्लीत 868, पंजाब 895 इतके दिसून येते. सर्वाधिक स्त्रीभ्रूणहत्या दिल्ली, ान, गुजरात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश या राज्यात झालेले आहेत, आणि 6 वा क्रमांक महाराष्ट्र राज्याचा

लागतो. भारतात दरवर्षी 18560 स्त्रीभ्रूणहत्या होत आहेत. नॅशनल क्राइम रेकॉर्ड 2007 ते 2011 या कालावधीत महाराष्ट्रात 1232 स्त्रीभ्रूण हत्या झाल्याची नोंद केली आहे.

**स्त्री भ्रूण हत्याची कारणे :**

**1) मुलगा हा वंशाचा दिवा :-**

भारतीय समाजामध्ये पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे मुलगा हा वंशाचा दिवा ही चुकीची व खुळचट कल्पना रूढ झालेली आहे. मुलगा हा वंशाचा दिवा ही संकल्पना अधिक रुढ झाली. मुलगा आपला वंश हा पुढे चालवतो असा चुकीचा समज रूढ झाला. परंतु समाजामध्ये मुलगी ही एकाच घरी नव्हे तर दोन्ही घरी दिवा लावण्याचे काम करते. परंतु भारतीय समाज मनामध्ये मुलगा हाच वंशाचा दिवा हे अधिक रूढ झाल्यामुळे मुलीना दुय्यम दर्जा दिला जातो. वडीलांच्या मृत्यूनंतर मुलगाच त्यांची सर्व धार्मिक विधी करतो दशक्रिया विधी करतो. हा अधिकार मुलगा म्हणून पुरुषांना असतो. कुटुंबाचा वारसा सांभाळतो आणि त्यांचे नाव पुढे चालवतो. परिणामी स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्थान दिले जाते. कौटुंबिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रामध्ये पुरुषांचे वर्चस्व दिसून येते. त्यामुळे प्रत्येकाला वंश चालवण्याच्यासाठी मुलगा हवा असतो. त्यामुळे मुलगी अपत्य असताना मुलांसाठी वाट पाहिली जाते आणि कुटुंबामध्ये 5 - 7 मुलीनं नंतरही हट्ट धरला जातो.स्त्रीभ्रूणहत्या ही समाजामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वाढताना दिसून येत आहे.

**2) भारतामध्ये पितृसत्ताक कुटुंब पद्धती :-**

भारतामध्ये पितृसत्ताक कुटुंब पद्धती आहे. त्यामुळे विवाह झाल्यानंतर मुलींना पतीच्या घरी वास्तव्य करण्याच्या साठी जावे लागते. त्यामुळे त्यांना त्या ठिकाणी दुय्यम स्वरूपाची वागणूक दिली जाते. घरातील स कारभार व व्यवहार ही पुरुषांच्या नावे चालतात पुरुषच हा घरातील कर्ताधर्ता असतो. त्यामुळे पुरुषांना अधि महत्त्व दिले जाते. कुटुंबामध्ये सुद्धा मुलीपेक्षा मुलगा हाच आपल्या कुटुंबाचा आधार म्हणून त्याच्याकडे विशेष ल दिले जाते. खाण्यापिण्याच्या सवयी, शैक्षणिक सुविधा व आरोग्याच्या सुविधा मुलांना अधिक दिल्या जातात. घराबाहे पडण्याचा व नोकरी करण्याचा व्यवसाय करण्याचा अधिकार हा फक्त पुरुषांनाच असतो स्त्रियांना तो दिला जा नाही. पुरुषी वर्चस्व समाज या प्रकारची समाजातील मानसिकता पितृसत्ताक व्यवस्थेत दिसून येते परिणा स्त्रीभ्रूणहत्या होण्यास कारणीभूत ठरते.म्हणजे अशी सामाजिक रचना स्त्रीभ्रूण हत्या करण्यासाठी प्रोत्साहित कर

**3) स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्थान :-**

प्राचीन काळापासून धर्म, रूढी आणि परंपरा यांच्या नावाखाली स्त्रीला भारतीय समाजात दुय्यम स्था दिले गेले. तिला अनेक मानवी हक्क नाकारले गेले. तिच्या गुलामगिरीच्या जीवनाचे उदात्तीकरण करण्यात आ त्यामुळे स्वातंत्र्य, समता, न्याय या गोष्टीपासून भारतीय स्त्री प्राचीन काळापासून वंचित रहावे लागले. स्त्रियां समाजातील असणाऱ्या दुय्यम स्थानामुळे स्त्रीभ्रूणहत्या प्रमाण वाढत आहे. भारतीय समाज रचनेत स्रियांना शिक्षणा अधिकार नाकारला जातो. सक्तीचे शिक्षण असतानाही 10 किंवा 12 वी झाल्याबरोबर मुलींचे बालविवाह होता मुली हुशार असल्या तरी त्यांना उच्च शिक्षण घेऊ दिली जात नाही त्यांना समाजाचा व कुटुंबातील सदस्यांचा वि असतो. मुलींनी शिक्षण घेतले तरी त्यांना नोकरी करू दिली जात नाही. चुल आणि मूल यामध्ये तिला अडकवि जाते. परिणामी स्त्रियांचा विकास होत नाही.

**4) अज्ञान, अंधश्रद्धा, जुनाट चालीरीती, रूढी - परंपरा :-**

भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात अज्ञान आहे. मुलगा हाच वंशाचा दिवा, मुलगी शिकून काय करणा मुलींनी घराबाहेर पडू नये. मुलगी शिकली व नोकरी केली तर धर्म बुडेल. अशा जुनाट व खुळचट चालीरीती व रु

रा समाज व्यवस्थेत आहेत. त्यामुळे समाजाकडून स्त्रियांना तुच्छ दर्जाची वागणूक दिली जाते. परिणामी यांना राजकारण, समाजकारण, अर्थकारण, कौटुंबिक व व्यवहारांमध्ये सहभाग घेऊ दिला जात नाही. अशी म वागणूक त्यांना दिली जाते. या अंधश्रद्धा मुळे स्त्रियांच्या विकासात अडथळा निर्माण होतो. परिणामी भ्रूणहत्या होतात.

**हुंडा प्रथा आणि आर्थिक भाराची भीती :-**

मुलीच्या लग्नामध्ये हुंडा प्रथा ही भारतीय समाज व्यवस्थेला लागलेला कलंक आहे .मुलगी वयात यानंतर किंवा उपवर झाल्यानंतर तिचा विवाह करताना वधू पक्षाकडून वर पक्षाला वरदक्षिणा म्हणून पैसा. ने, वस्तू, कपडे लत्ते इत्यादी खर्च हुंडा म्हणून द्यावा लागतो. पाहुणे मंडळीला जेवणावळी, आदरातिथ्य तितके वे लागते. गरीब श्रीमंत हे सर्वांनाच करावी लागते. परिणामी अनेक कुटुंब यामुळे उद्ध्वस्त होतात. अनेक करी हुंडाप्रथेला कंटाळून आत्महत्येला जवळ करतात. विवाह झाल्यानंतर अनेक कुटुंबाकडून मुलीचा छळ केला . माहेराहून पैसे, दागिने आणण्यासाठी तिला प्रोत्साहित केले जाते. माहेरी पाठवले जाते. मारहाण केली जाते. चार केला जातो. परिणामी वडीलांची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे ते देऊ शकत नाहीत. त्यामुळे अनेक ांना आपला जीव गमवावा लागतो आत्महत्या करावी लागते. हा सर्व त्रास आई-वडिलांना सुद्धा नको वाटतो. ामी आई-वडील मुलगीच नको. मुलींचा आर्थिक भार वाटतो. या भावनेतून विचार करतात आणि यातून भ्रूणहत्या होतात. आनेक मुलींना पुरुषा बरोबर विवाह करण्याकरिता हुंडा किंवा पैशाच्या स्वरूपामध्ये मोबदला लागत आहे.मुलीची सुरक्षितता धोक्यात आली आहे. काहीवेळा हुंड्याच्या मागणीमुळे मुलींच्या जीवालाही धोका ण होऊ शकतो. महाराष्ट्रात तर दर 16 तासांनी हुंड्याशी संबंधित गुन्हा घडतो. या कारणामुळे स्त्रीभ्रूणहत्या ा वाढत आहे.

**महिलांवर होणारे अत्याचार :-**

कोणत्याही कुटुंबात मुलगी जन्माला आली म्हणजे त्या कुटुंबात नाराजी व्यक्त केला जाते.त्याचे कारण ला कितीही शिक्षण दिले तरी शेवटी ती सासरी जाणारच आहे. परक्याचे धन आहे. त्यामुळे तिचे शिक्षण आपल्या कामाचे नाही असा समाज बहुतांश कुटुंबांनी करून घेतलेला आहे. तिच्या शिक्षणाचा आपल्याला कोणताही र मिळणार नाही. याशिवाय मुलीचे शिक्षण तिचे लग्न हुंडा इत्यादी गोष्टीचा विचार केला जातो. हुंडा देऊन वे लग्न केले तरी तिच्या सासर कडून जाचास सामोरे जावे लागतेच म्हणजेच माहेर वरून काहीतरी पैसे घेऊन पैसे नाही आणल्यास तिला मानसिक शारीरिक त्रास होतो. अशावेळी स्त्री आत्महत्या करण्याचा प्रयत्न करते हत्या केली जाते. म्हणजेच तिचा हुंडा बळी दिला जातो. तरीही 1961 साली हुंडा बंदी कायदा अमलात ला व काही घटनांवर आवर घालण्यात आला आहे. काही वेळा स्त्रीची हत्या करण्यासाठी पुरुष वेगवेगळ्या चा अवलंब करीत असतो. यामुळे स्त्रीभ्रूणहत्या चे प्रमाण वाढत आहे.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड अहवालानुसार 2007 मध्ये महिला अत्याचाराचे 1,85, 312 तर 2008 मध्ये 5,846 तसेच 2009 मध्ये 2,03,840 गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. याच काळात 2006 ते 2008 मध्ये 000 महिला व मुलीचे तर 19,129 बालकांचे अपहरण झाले. बलात्काराचे सुमारे 61 हजार तर हुंडाबळी चे 883 गुन्हे नोंदविले गेले. विनयभंग व लैंगिक अत्याचाराच्या 48, 894 गुन्ह्यांची नोंद झालेली आहे. वाय अंधश्रद्धे पोटी तसेच पैशासाठी बालकांना जिवंत मारणे, अर्भकांची हत्या करणे व स्त्रीभ्रूणहत्या करणे या ांची आकडेवारी वेगळी आहे. गुन्हेगारीची संख्या पाहता आणि स्त्रीभ्रूणहत्या व महिला वरील वाढत्या अत्याचारावरून क्षेप केला असता महिला व बालका बाबतची उदासीनता यातून लक्षात येते.

**7) बेकायदेशीर लिंग निर्धारण चाचणी उपलब्धता :-**

सोनोग्राफीद्वारे लिंग तपासणे हा या कायद्यांतर्गत गुन्हा आहे. कायद्याने केवळ अनुवांशिक विकारांसारख्या वैद्यकीय कारणांसाठी प्रसवपूर्व निदान तंत्रांच्या वापरास परवानगी दिली आहे तसेच अनेक वैद्यकीय उपकरणाच्या माध्यमातून लिंग तपासणी केली जाते. समाजातील असणाऱ्या बेकायदेशीर लिंग निदान करण्यास बंदी घालावी. बेकायदेशीर सोनोग्राफी मशीन चा आधार घेऊन जन्मताच मारून टाकणे,एकतर्फी प्रेमातून? सिड टाकून किंवा हल्ला करून, हुंड्यासाठी लग्नानंतर संसार उपयोगी साहित्य नसल्यामुळे, मुलांच्या शिक्षणासाठी माहेरून पैसे आणण्याच्या कारणावरून, नवऱ्याच्या सुखकारक जीवनशैली साठी आणि बलात्कार करून इ. गोष्टींचा आधार घेऊन पुरुष महिलांची हत्या करत असतो.

**8) डॉक्टरांची अमानुष वागणूक :-**

डॉक्टरांना देव समजून लोक दवाखान्यात जात असतात. मात्र हेच डॉक्टर आर्थिक फायद्यासाठी भक्षक बनतात. चिमुकल्या कळीचा जीव आईच्या गर्भातच करून टाकतात. नुकतेच बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील डॉ. सुदाम मुंडे आणि त्यांच्या पत्नी डॉ. सरस्वती मुंडे यांनी गर्भपात केले स्त्रियांचे अनेक अर्भके त्यांच्या शेतातील पडक्या विहिरीत सापडले. एवढेच नाही तर चिमुकली चे अर्भके मिक्सरमध्ये बारीक करून कुत्र्यांना टाकल्याची दिसून आले. अशा डॉक्टरांना मरेपर्यंत फाशीची शिक्षा दिली पाहिजे तसेच लिंग प्रतिरोध परीक्षण कायदा कडक करणे महत्त्वाचे आहे.

**9)कुटुंबातील वंशावळीतील पुरुष वारसांना सामाजिक दबाव आणि पसंती :-**

कुटुंबातील समाजामध्ये स्त्री वारसापेक्षा पुरुष वारस हा सामाजिक दबाव आहे.कुटुंबाच्या वंशावळीतील पुरुष वारसांमध्ये मुख्यत्वे ज्येष्ठ पुत्र, इतर मुले, आणि वडिलांचे किंवा आजोबांचे वारस यांचा समावेश होतो. हिं वारसा कायदा, 1956 नुसार, पुरुष सदस्यांना संयुक्त मालमत्तेत वारसा हक्क असतो. मुलगी परक्या लोकांचे ध आहे म्हणून वंशाकरिता मुलगा हवा ही संकल्पना अधिक रूढ होत गेली. यातूनच स्त्रीभ्रूणहत्याच प्रमाण वाढत आहे

**स्त्री भ्रूणहत्येचे परिणाम:**

**1) घटते लिंग गुणोत्तर :-**

स्त्रीभ्रूणहत्येमुळे भारतातील लिंग गुणोत्तराच्या प्रमाणात विषमता व बदल दिसून येतो. 1901 दर हजा पुरुषामागे 972, 1981 दर हजार पुरुषामागे 962 ,1991 दर हजार पुरुषामागे 945 ,2001 हजा पुरुषामागे 927, 2011 दर हजार पुरुषामागे 914 हे लिंग गुणोत्तर आहे.

देशातील काही विकसित घटक राज्यांचा विचार केल्यास स्त्रियांचे प्रमाण खूप कमी असल्याचे दिसू येते. केरळ दर हजारी पुरुषामागे 1084, तामिळनाडू 995 ,पश्चिम बंगाल 950, मध्य प्रदेश 931, महारा 929, राजस्थान 928, गुजरात 919, बिहार 918, उत्तर प्रदेश 912, दिल्ली 868 व पंजाब मध्ये 895 इत दिसून येते. 2011 च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र राज्याचे लिंग गुणोत्तर 929 आहे तर मराठवाडा विभागा 932 इतके आहे. या लिंग गुणोत्तरातील बदलामुळे अनेक सामाजिक राजकीय आर्थिक प्रश्न व समस्या निर्मा होतात.

**2) विवाह समस्या/ वैवाहिक समस्या :-**

मुलींच्या संख्येतील कमतरता हे ग्रामीण भागात विशेषतः मुलांच्या विवाहाच्या समस्येचे एक प्रमुख कार आहे. मुला-मुलींच्या प्रमाणातील तफावत हे सुद्धा या समस्येचे एक कारण आहे सध्या भारतामध्ये विवाह करि मुलीची कमतरता आहे. त्यामुळे वैवाहिक समस्या ही एक सामाजिक समस्या बनत आहे. प्रत्येक गावामध्ये 30

0 मुले विवाह करण्यासाठी इच्छुक आहेत. परंतु त्यांना वधू मिळत नाही यामुळे त्यांच्यावर अविवाहित राहण्याची ळ येत आहे हा एक खूप मोठा सामाजिक समस्या निर्माण झाली आहे. यातूनच पुढे व्यसनाधीनता, गुन्हेगारी, गुंड वृत्ती, बलात्कार, या समस्या निर्माण होत आहेत.

**) महिलांच्या तस्करीत वाढ :-**

विवाह करिता महिलांचे प्रमाण कमी असल्यामुळे महिलांची तस्करी करणे तसेच महिलावर अपराध व नेक गुन्ह्याची वाढ होत आहे. समाजामध्ये पुरुष आणि स्त्री यांच्यामध्ये जन्मदरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये तफावत सून येत आहे. तसेच विवाह करिता मुलींचे प्रमाण हे अल्प आहे या दृष्टिकोनातून समाजामध्ये सध्या मोठ्या माणामध्ये महिलांची मोठ्या प्रमाणात तस्करी होत आहे. तस्करीच्या माध्यमातून महिला व अनेक अन्याय अत्याचार त असून गुन्ह्याची वाढ होत आहे. राजस्थान सारख्या राज्यात आणि गावे आहेत की ज्या गावांमध्ये गेल्या 25 र्षात एकाही मुलाचा विवाह झालेला नाही. स्त्री विरहित गाव निर्माण होत आहेत.

केरळ राज्यातून अनेक मुलीना येमन देशांमध्ये विक्री केली जाते. गरीब कुटुंबातील आई-वडिलांना पैशाचे मिष दाखवून त्यांच्या अल्पवयीन मुलीना विकले जाते. हरियाणा गुजरात राजस्थान इत्यादी राज्यातून महाराष्ट्रातील नेक गरीब कुटुंबांतील मुलीच्या वडिलांना हुंडा देऊन पैसे देऊन त्यांच्या अल्पवयीन मुलीशी विवाह केला जातो.

**बालविवाहाची प्रथा :-**

स्त्रीभ्रूण हत्या मुळे गरीब कुटुंबातील अल्पवयीन मुलींचे बालविवाह मोठ्या प्रमाणात होत आहेत. बीड ल्ह्यात दरवर्षी ऊसतोड कामगारांच्या मुला मुलींचे बालविवाह होतात. ऊस तोडणी साठी पती-पत्नीचे कोयते सते वही कोयते तयार करण्यासाठी मुकादमाकडून उचल दिली जाते. या आमिषा पोटी अल्पवयीन मुला-मुलींचे वाह होतात. त्यामुळे स्त्रीच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात.

**सामाजिक विकास आणि महिला सक्षमीकरणातील अडथळा :-**

स्त्रीभ्रूणहत्यामुळे सामाजिक विकास खुंटतो व महिला सक्षमीकरणासाठी अडचणी निर्माण होतात हिलांना सक्षमीकरण करण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होतात.यामध्ये समाजातील असणाऱ्या अनेक रुढी, प्रथा, परा, या सामाजिक कारणाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाकडे तेवढा आणखी विकास झालेला नाही. णत्याही सामाजिक, आर्थिक, राजकीय बदलाचा पहिला बळी स्त्री ठरते. महिला सबलीकरणासमोर अशी अनेक व्हाने आहेत .सर्वात महत्त्वाचे आवाहन म्हणजे तिच्या स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न होय. स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, य व्यवस्थेतील बदल, लिंग समानतेचा अभाव, आर्थिक तरतुदीचा अभाव, सोयी सुविधांचा अभाव, आयुष्यभर वाचा भार उचलणारी विषम अवस्था, केवळ स्थिरचनेपलीकडे कसलीच विषमता नसताना समाज व्यवस्थेची ानतेशी लढा उभारण्याचे कार्य हाती घ्यावे लागत आहे.

**समाज आणि अर्थव्यवस्थेत महिलांचे संभाव्य योगदान कमी होणे :-**

समाज आणि अर्थव्यवस्थेत महिलांचे संभाव्य योगदान कमी होण्यामागे लिंगभेद, शिक्षणाचा अभाव, र्थिक स्वातंर्त्याचा अभाव, कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदाऱ्या, राजकीय आणि सामाजिक निर्णय प्रक्रियेत ी सहभाग आणि आरोग्यविषयक समस्या ही प्रमुख कारणे आहेत. यामुळे देशाच्या आर्थिक वाढीवर आणि ाजिक प्रगतीवर नकारात्मक परिणाम होतो. स्त्रीभ्रूणहत्येमुळे समाजातील महिलांना समाज आणि अर्थव्यवस्थेमध्ये ानता दिसून येत नाही.

**बहुपतित्व :-**

प्राचीन काळात बहुपत्नीत्वाची प्रथा रूढ होती. परंतु अलीकडे स्त्रियांच्या कमतरतेमुळे स्त्रीभ्रूणहत्येमुळे

बहुपतित्वाची वेळ येत आहे. हरियाणा राजस्थान, पंजाब इत्यादी राज्यात अनेक कुटुंबात दोन भावांमध्ये पाच भावांमध्ये एकच पत्नी करण्याचा प्रघात रूढ होत आहे. हे सशक्त समाजासाठी चांगले लक्षण नाही.

**8) गुन्हेगारीत वाढ :-**

स्त्रीभ्रूण हत्या मुळे सामाजिक असंतुलन निर्माण होते लैंगिक अभावामुळे गुन्हेगारीत वाढ होते अनैतिक संबंधांमध्ये वाढ होते. अल्पवयीन मुलीना फोर्स लावून पळून घेणे विवाहित महिलांना पळवून नेली बलात्कार, शोषण , वेश्या वृत्ती वाढीस लागते.

**9) आर्थिक परिणाम :-**

समाजामध्ये कार्य करणाऱ्या लोकसंख्येमध्ये विषमता निर्माण होते. यामुळे विविध उद्योग, संस्था या ठिकाणी विषमता निर्माण होते. कौटुंबिक अस्थिरता निर्माण झाल्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होते.

**10) लोकसंख्या शास्त्रीय परिणाम :-**

लोकसंख्या संरचनेमध्ये बदल होतो. लिंग गुणोत्तरात विषमता निर्माण होतो. लोकसंख्येवर याचा विपरीत परिणाम होतो. लोकसंख्या वाढ वितरण लोकसंख्या स्थलांतर यावर विपरीत परिणाम होतो.

**स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी उपाय योजना**

1)गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र (PCPNDT) कायदा : 1994

या कायद्याद्वारे गर्भधारणेपूर्वी किंवा प्रसूतीदरम्यान गर्भाचे लिंग निश्चित करण्यासाठी निदान तंत्रांचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

2) भारत सरकारने 22 जानेवारी 2015 रोजी बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना सुरू करण्यात आली.

3) महाराष्ट्र राज्य शासनाची सुकन्या योजना

4) माझी कन्या भाग्यश्री योजना

5) महाराष्ट्र राज्य सरकारने स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी 104 हा टोल फ्री क्रमांक सुरू केला आहे

6) लिंग परीक्षण प्रतिरोध कायदा अधिनियम

7) मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नेंसी अक्ट

8) साली गर्भजल परीक्षा विरोधी कायदा 1988

9) हुंडा विरोधी कायदा अधिनियम 1961

10) मुलांच्या संपत्तीमध्ये समान अधिकार अनुमोदन कायदा.

आधुनिक काळात स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी सर्वप्रथम कायद्याची अंमलबजावणी प्रभावी करणे गरजे आहे. त्याचबरोबर लोकशिक्षणाच्या माध्यमातून समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :-**

1) समाजातील अज्ञान अंधश्रद्धा रुढी परंपरा या दूर करून सर्वांना शिक्षण देणे आवश्यक आहे त्याचबरो स्त्री पुरुष हा भेद न करता समानता निर्माण करणे आवश्यक आहे.

2) सामाजिक, आर्थिक, राजकीय, कौटुंबिक, धार्मिक इत्यादी कार्यात पुरुषाबरोबर स्त्रियांना स्थान दि पाहिजे.

3) वडिलोपार्जित संपत्ती मध्ये मुलाप्रमाणे मुलीला सुद्धा समान अधिकार देणे आवश्यक आहे.

4) हुंडा प्रतीची समूळ उच्चाटन करून हुंडा घेणाऱ्यास कडक शासन केली पाहिजे.

शासकीय व प्रशासकीय स्तरावर कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली पाहिजे सरकारच्या कारभारा

पारदर्शकता आली पाहिजे तरच असे प्रश्नांची सोडवणूक होऊ शकते
कायदा अधिक शिक्षण अधिक जागरूकता अधिक सामाजिक परिवर्तन या चार स्तंभावरच स्त्रीभ्रूणहत्येचे निर्मूलन शक्य आहे
स्त्रीभ्रूणहत्येसाठी केवळ कायदा पुरेसा नाही सामाजिक नैतिक बदल आणि जनजागृती आवश्यक आहेत. मुलगा हा वंशाचा दिवा आहे ही मानसिकता बदलावी.

## संदर्भ सूची

भारतीय जनगणना: 2011
महिला सक्षमीकरण आणि शासकीय योजना मासिक
वृत्तपत्र: दै. द हिंदू, दै.लोकसत्ता दै. लोकमत आणि दै.सकाळ वर्तमानपत्रातील लेख
ICDS वेबसाईट
PIB वेबसाईट
Pmindia.Gov.in
NCW.Gov.in
अमर्त्य सेन यांचे "Missing girl" book
प्रा. नागोराव कुंभार विचार शलाका, समकालीन सामाजिक समस्या विशेषांक जुलै 2011 ते एप्रिल 2012.




**प्रा. डॉ. जयदीप रामकृष्ण सोळुंके**

M.A.(P.A.,Geo.,Eng.)B.Ed., M.Phil., Ph.D., D.A.T., D.Y.T., N.D.

सहयोगी प्राध्यापक, भूगोल विभाग

श्री.पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय ,

सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड (महाराष्ट्र)


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर, संलग्नित श्री. पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड. येथे सन २००५ पासून भूगोल विभागात कार्यरत. कृषी भूगोलावरील दोन संदर्भ ग्रंथांचे लेखन तसेच इतर पाच ग्रंथांचे संपादन केले. २०२० पासून पदव्युत्तर शिक्षक व संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता चार संशोधक विद्यार्थी मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. ६० पेक्षा अधिक कार्यशाळा, चर्चासत्र व परिषदात सहभागी होऊन ४० पेक्षा अधिक शोधनिबंधाचे वाचन व प्रकाशन केले. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शोध पत्रिकेत १५ पेक्षा अधिक शोधनिबंधाचे प्रकाशन केले. २०२० पासून भूगोल विषयाच्या Vision Research Journal for Geography and Geology चे संपादक. २००६ ते २०२२ सलग १७ वर्षे रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्य. मे २०२३ पासून सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत. महाविद्यालयीन व विद्यापीठीय स्तरावर अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे उत्कृष्टरित्या सूत्रसंचालन केले.

२०१५ पासून योग प्रशिक्षक म्हणून योगदान. योग शिबीरात व रा. से. यो. शिबीरात योग शिक्षक म्हणून यशस्वी भूमिका पार पाडली.

**प्रकल्प कार्य :**

१) सिरसाळा परिसरातील शेती विषयक सर्वेक्षण

२) मराठवाड्यातील खुल्या प्रवर्गातील ग्रामीण भागातील मुलींच्या महाविद्यालयीन शैक्षणिक स्थितीचा अभ्यास

३) परळी तालुक्यातील आठवडी बाजार केंद्रातील भाजीपाला विक्रेत्यांचा अभ्यास. हे तीन प्रकल्प कार्य पूर्ण केले.

**पुरस्कार:**

१) महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक परिषदेचा राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार २०२१.

२) Inspirational of India Award २०२५.

३) Dr. Bhimrao Ambedkar The Power of Knowledge Award २०२५.

४) Nelson Mandela Inspire Award २०२५.


**Jyotichandra Publication**

Gyandev Parbati Niwas, Near Vishal School

LIC Colony, Latur (M.S.) India- 413531

Contact : 8484818000, 7276305000

ISBN : 978-93-85162-8